Teachingninja.in

Latest Govt Job updates

Private Job updates

Free Mock tests available

Visit - teachingninja.in

Teachingninja.in

# Maharashtra SRPF

## Previous Year Paper

### 23 July, 2023

Teachingninja.in

भारत राखीव बटालियन-2, राज्य राखीव पोलीस बल गट क्र 15

बिरसी कॅम्प, गोंदिया

सशस्त्र पोलीस शिपाई भरती-2021

लेखी चाचणी परीक्षा प्रश्नपत्रिका

**B**

वेळ-1.30 तास

दिनांक 23/07/2023

गुण-100

सूचना - 1) सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.

2) प्रत्येक बरोबर उत्तरास एक गुण आहे.

3) वजा गुण पध्दती नाही.

---

1) UJ, TK, SL, RM, QN, ?

अ) PO  ब) JP  क) VI  ड) IV

2) $\frac{B}{6}, \frac{E}{9}, \frac{H}{12}, ?$

अ) $\frac{N}{14}$  ब) $\frac{K}{15}$  क) $\frac{J}{14}$  ड) $\frac{J}{15}$

3) $\frac{5}{9}, \frac{7}{12}, \frac{9}{15}, \frac{11}{18}, ?$

अ) $\frac{13}{19}$  ब) $\frac{13}{21}$  क) $\frac{12}{19}$  ड) $\frac{12}{21}$

4) 4, 9, 19, 39, ?

अ) 69  ब) 74  क) 79  ड) 84

5) खालील रिकाम्या जागी भरावयाच्या अक्षरांचा योग्य क्रमाने असलेला गट निवडा .

bd_b_fb_ _bd

अ) fddf  ब) ffdf  क) bddf  ड) bbdf

6) खालील अक्षरमालिकेतील विसंगत (गटात न बसणारे) अक्षर गट ओळखा.

अ) HIJ  ब) MNO  क) WXY  ड) RQP

7) AB :ZY तर CD : ?

अ) XW  ब) WX  क) YX  ड) WV

8) अक्षर संबंध ओळखा.

BDF : 246 तर HPQ : ?

अ) 81617  ब) 71516  क) 81718  ड) 71718



Teachingninja.in

9) खालील अक्षरमालिकेतील विसंगत (गटात न बसणारे) पद ओळखा.

अ) मुंबई　　ब) कोलकता　　क) चेन्नई　　ड) नागपूर

10) खालील शब्दांतील समान संबंध ओळखा.

हिंदू - मंदीर तसे शिख - ?

अ) मशीद　　ब) अग्यारी　　क) गुरूद्वार　　ड) दर्गा

11) 100 : 121 तर 400 : ?

अ) 421　　ब) 399　　क) 441　　ड) 411

12) 5 : 30 तर 7 : ?

अ) 35　　ब) 40　　क) 60　　ड) 56

13) एका सांकेतिक भाषेत CAT हा शब्द DBU असा लिहित असतील तर HORSE हा शब्द कसा लिहिला जाईल ?

अ) ESROH　　ब) IPSTF　　क) IPTUS　　ड) RSEOH

14) सूर्याला चंद्र म्हटले, चंद्राला पृथ्वी म्हटले, पृथ्वीला पाणी म्हटले, पाण्याला नदी म्हटले, नदीला विहीर म्हटले तर तहान लागल्यावर काय प्याल ?

अ) पाणी　　ब) सूर्य　　क) चंद्र　　ड) नदी


15) एका सांकेतिक भाषेत UBGPF या शब्दाचा संकेत 57234 हा आहे तर 247 हा संकेत कोणत्या शब्दासाठी असेल ?

अ) GFB　　ब) BFG　　क) PGB　　ड) FGB

16) 1, 27, 125, 343, ?

अ) 525　　ब) 625　　क) 729　　ड) 784

17) प्रश्नचिन्हाच्या जागी कोणती संख्या येईल ?




अ) 27　　ब) 22　　क) 18　　ड) 16

18) प्रश्नचिन्हाच्या जागी योग्य पर्याय निवडा.

| | | |
|---|---|---|
| 1 | 2 | 3 |
| 25 | ? | 81 |
| 4 | 5 | 6 |


अ) 64　　ब) 49　　क) 144　　ड) 36

Teachingninja.in

19) मुलांच्या रांगेत प्रथमेशचा क्रमांक डावीकडून 12 व उजवीकडून 5 वा आहे, तर त्या रांगेत एकूण किती मुले आहेत ?

अ)18 ब) 16 क) 17 ड) 11

20) खालील वर्तुळातील प्रश्नचिन्हाच्या जागी कोणती संख्या येईल ?





अ) 25 ब) 30 क) 35 ड) 40

21) एक मुलगा घरापासून सरळ पूर्वेला 6 कि.मी.गेला. नंतर तो उजवीकडे वळून 8 कि.मी.गेला तर तो मुलगा शाळेपासून सरळ किती कि.मी.अंतरावर असेल ?

अ) 8 ब) 10 क) 12 ड) 6

22)




अ) 7 ब) 14 क) 12 ड) 13

23) एका कार्यालयाचा आठवडा गुरूवारपासून सुरू होतो तर या आठवडयातील पाचवा दिवस कोणता ?

अ) सोमवार ब) मंगळवार क) बुधवार ड) शनिवार

24) रवीने एका व्यक्तीकडे बोट दाखवून सांगितले की यांचा मुलगा माझ्या मुलाचा मामा आहे. तर तो माणूस रवीचा कोण ?

अ) वडील ब) आजोबा क) चुलता ड) सासरा

25) 120, 120, 60, 20, 5, ?

अ) 0 ब) 1 क) 2 ड) 3

26) तोंडावाटे निघणाऱ्या मूलध्वनींना ------ म्हणतात.

अ) स्वर ब) वर्ण क) वाक्य ड) शब्द

27) विपत्काल या शब्दसंधीचा योग्य विग्रह ओळखा.

अ) विपत् + काल ब) विपद् + काल क) विप+काल ड) विप+त्काल

28) पुन:+जन्म या शब्दाची योग्य संधी ओळखा.

अ) पुन्हाजन्म ब) पुनर्जन्म क) पुर्नजन्म ड) पुर्णजन्म



Teachingninja.in

29) पुढील म्हण पूर्ण करा.

ज्याची खावी पोळी --------------

अ) मूठ सव्वा लाखाची  ब) त्याला डर नाही  क) त्याची वाजवावी टाळी  ड) त्याला खवखवे

30) केलेले उपकार जो जाणत नाही तो.

अ) कृतघ्न  ब) कृतज्ञ  क) निरिच्छ  ड) कर्मयोगी

31) 'हात दाखवून अवलक्षण' या वाक्प्रचाराचा समर्पक अर्थ सांगा.

अ) आपणहून संकट ओढवून घेणे  ब) चूक करणे  क) हात मोडणे  ड) भविष्य पाहणे

32) चांदण्या रात्रीचा पंधरवडा या शब्दसमूहास योग्य शब्द निवडा.

अ) कृष्णपक्ष  ब) शुक्लपक्ष  क) पाक्षिक  ड) वद्यपक्ष

33) ' सुसंगती सदा घडो, सुजन वाक्य कानी पडो 'या वाक्यातील अलंकार ओळखा.

अ) श्लेष  ब) अनुप्रास  क) उपमा  ड) यमक

34) वाल्मिकीने रामायण हा ग्रंथ लिहिला. या वाक्यातील 'रामायण' या शब्दाची जात ओळखा.

अ) कर्ता  ब) कर्म  क) सामान्य नाम  ड) विशेष नाम

35) क्षणोक्षणी, सालोसाल, फिरुन, पुनःपुन्हा हे कोणत्या क्रियाविशेषण अव्ययाचे प्रकार आहेत.

अ) कालदर्शक  ब) सातत्यदर्शक  क) आवृत्तीदर्शक  ड) वारंवारिता

36) मुलांनो तुम्ही मोठयांची आज्ञा पाळली पाहिजे. या वाक्यातील तुम्ही हे सर्वनाम-------- आहे.

अ) प्रथमपुरुषी एकवचनी  ब) व्दितीयपुरुषी अनेकवचन  क) संबंधी सर्वनाम  ड) अनुसंबंधी सर्वनाम

37) मांढरदेवीच्या यात्रेला <u>पुष्कळ</u> लोक आले होते यातील अधोरेखित विशेषणाचा प्रकार ओळखा.

अ) आवृत्तीवाचक  ब) क्रमवाचक  क) गणनावाचक  ड) अनिश्चित

38) खालील शब्दांपैकी 'विदुषी' या शब्दाचा विरुध्दलिंगी शब्द ओळखा.

अ) विदूषक  ब) विद्वान  क) विदुषा  ड) विद्वदकार

39) खालीलपैकी प्रशंसादर्शक केवलप्रयोगी अव्यय कोणते ते ओळखा.

अ) अबब !  ब) अरेच्चा !  क) छे !  ड) शाब्बास !

40) 'मरावे परी किर्तीरुपी उरावे' या वाक्यातील उभयान्वयी अव्यय कोणते ?

अ) परी  ब) किर्ती  क) रुपे  ड) उरावे

41) खालीलपैकी कोणता शब्द तिन्ही लिंगात सोयीस्करपणे वापरला जातो ?

अ) बाग  ब) मुंगूस  क) पोर  ड) वेळ



Teachingninja.in

42) "मी मराठी भाषेचा शिवाजी आहे" असे कोणी म्हटले.?

अ) कृष्णशास्त्री चिपळूणकर ब) विष्णुशास्त्री चिपळूणकर क) बाळशास्त्री जांभेकर ड) दादोबा तर्खडकर

43) 'पंचपाळे' या शब्दातील समास ओळखा.

अ) मध्यमपदलोपी ब) व्दिगू क) तत्पुरुष ड) अव्ययीभाव

44) खालील शब्दांपैकी शुध्द शब्द ओळखा.

अ) पारंपरिक ब) पारंपारिक क) पारंपारीक ड) परम्पारिक

45) 'आम्ही जातो अमुच्या गावा' या वाक्यात विधेय कोणते आहे ?

अ) गावा ब) अमुच्या क) आम्ही ड) जातो.

46) हलाहल या शब्दाचा अर्थ खालीलपैकी कोणता आहे ?

अ) हाल ब) हलचाल क) विष ड) यापैकी नाही

47) अली, मधुप, मिलिंद म्हणजे खालीलपैकी काय ?

अ) डोंगर ब) भ्रमर क) मकरंद ड) मधमाशी

48) 'पर्यावरण' या शब्दामधील लिंग ओळखा.

अ) पुल्लिंगी ब) स्त्रीलिंगी क) नपुंसकलिंगी ड) यापैकी नाही.

49) 'सूर्य पूर्वेला उगवतो' या वाक्यातील काळ ओळखा.

अ) पूर्ण वर्तमानकाळ ब) साधा वर्तमानकाळ क) अपूर्ण वर्तमानकाळ ड) यापैकी नाही

50) '<u>राजुने</u> पुस्तक कोठे ठेवले ?' या वाक्यातील अधोरेखीत शब्दाची विभक्ती ओळखा.

अ) व्दितीया ब) तृतीया क) पंचमी ड) षष्ठी

51) आर्य समाजाची स्थापना खालीलपैकी कोणी केली ?

अ) स्वामी रामानंद तीर्थ ब) स्वामी दयानंद सरस्वती क) स्वामी विवेकानंद ड) स्वामी परमहंस

52) घटनेच्या कोणत्या कलमान्वये जम्मू - काश्मीरला विशेष दर्जा देण्यात आला होता जो सन 2019 साली रद्द करण्यात आला ?

अ) 324 ब) 352 क) 370 ड) 380

53) खालीलपैकी कोणता तालुका गोंदिया जिल्हयात नाही ?

अ) तिरोडा ब) आमगाव क) तुमसर ड) देवरी

54) भारताचे संविधान खालीलपैकी कोणत्या दिवशी स्वीकारले गेले ?

अ) 26 ऑक्टो. 1949 ब) 26 नोव्हें. 1949 क) 26 डिसें. 1949 ड) 26 जाने. 1950

55) महाराष्ट्राचे सध्याचे राज्यपाल खालीलपैकी कोण आहेत ?

अ) रमेश बैस ब) भगतसिंग कोश्यारी क) राहूल नार्वेकर ड) राम नाईक



teachingninja.in
Teachingninja.in

56) ऐतिहासिक पुणे करार खालीलपैकी कोणामध्ये घडून आला ?
अ) डॉ. बाबासाहेब आंबेडकर - स्वा. सावरकर
ब) लो. टिळक - महात्मा गांधी
क) महात्मा गांधी - गोपाळकृष्ण गोखले
ड) डॉ. बाबासाहेब आंबेडकर - महात्मा गांधी

57) सध्या सीबीआयचे संचालक म्हणून खालीलपैकी कोणाची नियुक्ती झाली आहे ?
अ) सुबोधकुमार जायस्वाल
ब) प्रवीण सूद
क) संजीवकुमार
ड) प्रवीण परदेशी

58) खालीलपैकी कोणत्या जिल्हयाचे विभाजन करून गोंदिया जिल्हयाची निर्मिती करण्यात आली ?
अ) गडचिरोली
ब) भंडारा
क) नागपूर
ड) चंद्रपूर

59) खालीलपैकी कोणती न्यायाधीशांची नियुक्ती आणि बदली करण्याची प्रणाली (system) आहे ?
अ) कॉलेजियम प्रणाली
ब) संसदीय प्रणाली
क) कॉलेज प्रणाली
ड) एकलस्त्रोत प्रणाली

60) सध्या भारताचे मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून खालीलपैकी कोण कार्यरत आहे ?
अ) टी. एन. शेषन
ब) यू. पी. एस. मदान
क) अरूण गोयल
ड) राजीवकुमार

61) खालीलपैकी कोणत्या गीताला महाराष्ट्र गीत म्हणून मान्यता मिळाली आहे ?
अ) बलसागर भारत होवो
ब) जय जय महाराष्ट्र माझा
क) प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा
ड) वंदे मातरम

62) खालीलपैकी कोणाची भारतीय ऑलिम्पीक संघटनेच्या पहिल्या महिला अध्यक्ष म्हणून निवड झाली आहे ?
अ) पी. टी. उषा
ब) करनाम मल्लेश्वरी
क) सानिया मिर्झा
ड) साक्षी मलिक

63) जागतिक व्यापार संघटनेचे मुख्यालय कोठे आहे ?
अ) जिनिव्हा
ब) वॉशिंग्टन
क) दुबई
ड) दिल्ली

64) जागतिक महिला दिन खालीलपैकी कोणत्या दिवशी साजरा केला जातो ?
अ) 8 फेब्रुवारी
ब) 8 मार्च
क) 12 मार्च
ड) 10 मार्च

65) महाराष्ट्राला किती कि. मी. लांबीचा समुद्रकिनारा लाभला आहे ?
अ) 830
ब) 720
क) 750
ड) 810

66) पोलीस खात्यातील खालीलपैकी कोणते पद केवळ पदोन्नतीने भरले जाते ?
अ) पोलीस शिपाई
ब) पोलीस उपनिरीक्षक
क) पोलीस निरीक्षक
ड) पोलीस उपअधीक्षक

67) सत्यशोधक समाजाची स्थापना खालीलपैकी कोणी केली ?
अ) गो. ग. आगरकर
ब) राजाराम मोहन रॉय
क) महात्मा गांधी
ड) महात्मा फुले

68) श्रीहरीकोटाच्या सतीश धवन अंतराळ केंद्रावरून जुलै 2023 मध्ये खालीलपैकी कशाचे यशस्वी प्रक्षेपण करण्यात आले ?
अ) चांद्रयान 1
ब) चांद्रयान 2
क) चांद्रयान 3
ड) चंद्रयान



Teachingninja.in

69) मुसळधार पावसामुळे नुकतीच जुलै 2023 मध्ये रायगड जिल्ह्यातील याठिकाणी दरड कोसळण्याची दुर्दैवी घटना घडली आहे त्यामध्ये जिवितहानी झाली आहे ?

अ) ताम्हिणी ब) वरंधा क) अलिबाग ड) ईर्शाळगड

70) स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना कोणी केली ?

अ) डॉ. बाबासाहेब आंबेडकर ब) लोकमान्य टिळक क) सरदार वल्लभभाई पटेल ड) नारायण मेघाजी लोखंडे

71) सध्या निती आयोगाचे अध्यक्ष कोण आहेत ?

अ) नरेंद्र मोदी ब) द्रौपदी मुर्मू क) अमित शहा ड) ओम बिर्ला

72) 15 ऑगस्ट 2022 रोजी भारतीय स्वातंत्र्याचा कोणता महोत्सव साजरा करण्यात आला ?

अ) रौप्य ब) हीरक क) सुवर्ण ड) अमृत

73) विनेश फोगट हे नाव खालीलपैकी कोणत्या खेळाशी संबंधीत आहे ?

अ) क्रिकेट ब) टेनिस क) बॅडमिंटन ड) कुस्ती

74) ताडोबा - अंधारी व्याघ्र प्रकल्प खालीलपैकी कोणत्या जिल्ह्यात आहे ?

अ) ठाणे ब) चंद्रपूर क) गोंदिया ड) गडचिरोली

75) भारत राष्ट्र समिती हा पक्ष खालीलपैकी कोणाशी संबंधीत आहे ?

अ) के. चंद्रशेखर राव ब) जगनमोहन रेड्डी क) एम. के. स्टॅलिन ड) ममता बॅनर्जी

76) 73**5 या संख्येतील * च्या जागी समान अंक असून त्यांच्या स्थानिक किंमतीतील फरक 630 आहे तर * च्या जागी कोणता अंक आहे ?

अ) 8 ब) 7 क) 9 ड) 6

77) ---- ही मूळ संख्याही नाही व संयुक्त संख्याही नाही.

अ) 1 ब) 2 क) 4 ड) 5

78) D ही विषम संख्या आहे. तर क्रमाने येणारी पुढील विषम संख्या कोणती ?

अ) D + 1 ब) D + 3 क) D - 2 ड) D + 2

79) 5, 2, 4, 3 या अंकापासून तयार होणाऱ्या सर्वात मोठ्या व सर्वात लहान संख्येतील फरक किती ?

अ) 2995 ब) 3087 क) 3125 ड) 2733

80) 10 ते 20 या दरम्यान एकूण किती मूळ संख्या येतात ?

अ) 2 ब) 3 क) 4 ड) 5

81) 77 नंतर क्रमाने येणारी 9 वी विषम संख्या कोणती ?

अ) 86 ब) 95 क) 93 ड) 91

82) जर 4 मीटर अंतरावर 1 याप्रमाणे एक कि.मी. अंतरावर एकूण किती रोपे लावता येतील ?

अ) 25 ब) 50 क) 250 ड) 251



Teachingninja.in

83) एका संख्येची 5 पट आणि 9 पट यामध्ये 52 चा फरक आहे तर ती संख्या कोणती ?

अ) 13 ब) 4 क) 14 ड) 15

84) दोन संख्यांचा गुणाकार 432 आहे. त्यापैकी एक संख्या 16 असल्यास दुसरी संख्या कोणती ?

अ) 17 ब) 22 क) 27 ड) 24

85) ? ÷17 =14 तर प्रश्नचिन्हाच्या जागी कोणती संख्या येईल ?

अ) 238 ब) 258 क) 358 ड) यापैकी नाही

86) एका घराच्या बांधकामासाठी एकूण खर्च 9516425 रु. आला. त्यापैकी प्लॉटसाठी 2606127 रु. व बांधकाम साहित्यासाठी 5132358 रु. लागले आणि उरलेली रक्कम मजुरीसाठी खर्च झाली तर मजुरीसाठी किती रक्कम लागली ?

अ) 1777940 ब) 7738485 क) 3716432 ड) 21150325

87) 14 फॅनची किंमत 56000 रु. आहे, तर अशा 18 फॅनची किंमत किती ?

अ) 62000 ब) 90000 क) 72000 ड) 86000

88) 27 x (9 - 3) + 24 ÷ 3 = ?

अ) 160 ब) 170 क) 175 ड) 188

89) 18 x 5 ÷ 9 + 7 - 4 = ?

अ) 10 ब) 14 क) 20 ड) 13

90) 3 व 5 ने नि:शेष भाग जाणारी खालीलपैकी संख्या कोणती ?

अ) 61825 ब) 56435 क) 19125 ड) 25745

91) 12 आणि 15 यांचा मसावि आणि लसावि खालीलपैकी काय येईल ?

अ) 6 व 90 ब) 3 व 60 क) 4 व 45 ड) 4 व 75

92) खालीलपैकी सर्वांत लहान अपूर्णांक कोणता ?

अ) $\frac{12}{31}$ ब) $\frac{12}{32}$ क) $\frac{12}{33}$ ड) $\frac{12}{34}$

93) $\frac{4}{a}+\frac{6}{a}=5$ असल्यास a च्या जागी कोणता अंक येईल ?

अ) 4 ब) 5 क) 2 ड) 15

94) 0.52 + 12.35 + 4.580 = ?

अ) 15.480 ब) 17.450 क) 16.350 ड) 15.305



Teachingninja.in

95) 17576 या संख्येचे घनमूळ किती ?

अ) 24 ब) 26 क) 27 ड) 28

96) दोन संख्यांचा गुणाकार 216 आहे. जर त्यांचा मसावि 6 असेल तर लसावि किती ?

अ) 36 ब) 210 क) 222 ड) 1296


97) एका वर्गातील 20 विद्यार्थ्यांचे सरासरी वय 8 वर्षे आहे. जर त्यामध्ये त्यांच्या शिक्षकाचे वय मिळविले तर त्यांचे सरासरी वय 10 वर्षे होते, तर शिक्षकाचे वय किती ?

अ) 37 वर्षे ब) 40 वर्षे क) 50 वर्षे ड) 45 वर्षे

98) मोहनने एक घडयाळ 350 रुपयांना खरेदी केले आणि 392 रुपयांना विकले तर शेकडा किती % नफा झाला ?

अ) 9% ब) 12% क) 14% ड) यापैकी नाही.

99) खाली दिलेल्या आकृतीमध्ये किती चौकोन आहेत ?



अ) 18 ब) 20 क) 17 ड) 19

100) 12 व्यक्ती एक काम 4 दिवसांत पूर्ण करतात तेच काम 3 व्यक्ती किती दिवसात संपवतील ?

अ) 10 ब) 12 क) 14 ड) 16

-----------------------------------------------



Teachingninja.in